# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५७६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—१०/०९/२०१६

**१) मोटार पंपची चोरी . :—**

दिनांक ०८/०९/२०१६ रोजी २२.०० वा. ते दि. ०९/०९/२०१६ वा. दर. यातील फिर्यादी विरेन्द्र प्रेमदास मेश्राम वय ३८ वर्ष, रा. आंबेडकर वार्ड मुजबी यांचे शेतावरील नाल्याजवळ खुल्या जागेत १ लक्ष्मी कंपनीची मोटार पंप हिरव्या रंगाची कि. ५,०००/—रु. ची धानाला पाणी देण्याकरीता लावली असता कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुन मोटार पंपाचे वायर कापुन चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. शिंदे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) मोटार सायकल चालकांच्या निष्काळजीपणामुळे, एक जखमी . :—**

दिनांक ०९/०९/२०१६ रोजी ०७.०० वा. दर. यातील फिर्यादी नितीन गुरुप्रसाद भिवगडे वय ३४ वर्ष, रा. लाखनी याची भाची कुमारी अंन्शु नरेन्द्र मस्के वय १५ वर्ष, रा. लाखनी हि तिची मैत्रीन कु. गोल्डी ठाकरे सोबत शाही एकॅडमी टयुशन क्लास लाखनी येथुन टयुशन करुन परत एनएच ०६ रोडने सायकलने आपल्या घराकडे परत जात असतांना यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल हयगयीने, निष्काळीपने व भरधाव वेगाने चालवुन कुमारी अंन्शु हिच्या सायकलला सिंधी लाईन लाखनी येथे धडक मारुन तिला जखमी करुन मोटार सायकल घेवुन पळुन गेल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३३७ भांदवि. सहकलम १८४,१३४/१७७ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. उईके पो. स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**३) इंडीका गाडी चालकांच्या निष्काळजीपनामुळे सायकल स्वार जखमी . :—**

दिनांक ०९/०९/२०१६ रोजी १९.०० वा. दर. यातील जखमी सायकलस्वार राजपाल आसाराम खोब्रागडे वय ४५ वर्ष, रा. सोनी हा वडसा वरुन सोनी कडे येत असतांना सोनी गावाजवळ वडसा कडुन येणा—या आरोपी वाहन चालकाने आपल्या ताब्यातील वाहन निष्काळजीपने व हयगयीने चालवुन सायकलस्वारास सोनी येथे धडक मारुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम २७९,३३७ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. ढोक पो. स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**४)अवैध दारु अडयांवर धाडी . :—**

दिनांक ०९/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. कारधा, तुमसर, साकोली, व पवनी येथील अवैध दारु अडयांवर धाडी घालुन एकुण ०९ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ४४ लिटर हातभटट्री दारू + सडवा+ साहीत्य कि. ३,९३०/—रू. व ३ लिटर २७० मिली देशी दारू कि. ९००/—रू. असा एकुण ४,८३०/—रू. चा माल जप्त करण्यात आला.

(के.एच.धात्रक)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.